// //

नियमित दिवाणी मुकदमा क्र. ८३/२०१३
नि. ४५ लगत

शपथेवर सुरू

नि. १०६ चे आदेशानुसार पुढील सरतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. एम्.आय. सय्यद यांचेतर्फे

१२. मी नि. ६४ सोबत मुळ हक्कसोडपत्र हजर केलेले आहे. ते हक्कसोडपत्र राधाबाई आत्माराम सोनुर्लेकर यांनी मला आणून दिलेले होते. ते हक्कसोडपत्र हे मुंबई येथे करण्यात आलेले होते. ते हक्कसोडपत्र शुभांगी सुहास पंगेरकर, स्मिता गुरूदास पंगेरकर, सुमिता संजय मेळेकर यांनी करून दिलेले होते. त्यावर शुभांगीचा अंगठा असून इतर दोघींच्या सहया आहेत. तसेच त्यावर साक्षीदार म्हणून गुरूदास दयाळ पंगेरकर यांची सही आहे. ते हक्कसोडपत्र स्पेशल मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट मुंबई यांच्यासमोर केलेले आहे. त्यावर ओळख म्हणून ॲड. एस्. एस्. पवार यांनी सही केलेली आहे. मला ते हक्कसोडपत्र दाखवले ते तेच आहे. त्यास प्रशासकीय बाब म्हणून **नि. १०७** देण्यात येत आहे. नि. ६४ सोबत मी कुलअखत्यारपत्र दाखल केलेले आहे. ते कुलअखत्यारपत्र हे राधाबाई आत्माराम सोनुर्लेकर यांना त्यांच्या तीन मुली म्हणजेच शुभांगी सुहास पंगेरकर, स्मिता गुरूदास पंगेरकर, सुमिता संजय मेळेकर यांनी करून दिलेले होते. त्यावर साक्षीदार म्हणून जी.डी. पंगेरकर यांची सही आहे. ते कुलअखत्यारपत्र नोटरी श्री. एम्.एस्. गायतोंडे यांच्यासमक्ष केलेले आहे. मला आता ते कुलअखत्यारपत्र दाखवले ते तेच आहे. त्यास प्रशासकीय बाब म्हणून **नि. १०८** दिली आहे.

उलटतपास प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री.एस्.जी. बावकर यांचेमार्फत

१३. मी दावा मिळकतीचे व दाव्यात नमुद केलेल्या दिनांक ०६/०४/१९९१ रोजीच्या करारात नमुद असलेल्या मिळकतींचे सातबारा उतारे पाहिलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या मिळकतींच्या सातबाराच्या उता—यावर नियंत्रित सत्ता प्रकार असा शेरा होता. त्या मिळकतीच्या विक्रीसाठी उपविभागीय अधिकारी यांची परवानगी आवश्यक असते याची मला माहिती होती. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही उपविभागीय अधिकारी यांची परवानगी न घेता करार केलेला आहे.

१४. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत व करारात नमुद मिळकतींच्या सातबारा उता—यावर प्रतिवादी क्र. १ ते ३ व त्यांची आई राधाबाई आत्माराम सोनुर्लेकर यांच्या नांवाची नोंद होती. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यात दाखल असलेला करार प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी मला लिहून दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या करारासाठी असलेला मुद्रांक वादी अथवा राधाबाई सोनुर्लेकर यांनी विकत घेतलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, तो करार राधाबाई सोनुर्लेकर हिच्या स्वत:च्या हस्ताक्षरातील नाही. हे म्हणणे खरे नाही की, राधाबाई व माझ्यात कोणताही करार झालेला नव्हता.

१५. हे म्हणणे खरे आहे की, नि. १०७ कडील हक्कसोडपत्र व नि. १०८ कडील कुलअखत्यारपत्र माझ्यासमक्ष झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यात नमुद केलेली मिळकत व करारात नमुद असलेल्या मिळकतीच्या क्षेत्रात तफावत आहे. दाव्यात नमुद असलेल्या मिळकतीचे क्षेत्र एकूण २० गुंठे आहे. करारात नमुद असलेल्या मिळकतीचे क्षेत्र सुध्दा एकूण २० गुंठे आहे. मला आता नि. ८ कडील करार दाखवला. करारात एकूण २० गुंठे क्षेत्र नमुद आहे. करार दोन मिळकतींचा झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, नि. ०८ चा करार हा प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी मला करून दिलेला नाही. मला आता नि. ४६ कडील कागद दाखवला. हे म्हणणे खरे आहे की, नि. ४६ कडील कागदात माझे नांव नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि. ४६ कडील अर्जानुसार उपविभागीय अधिकारी यांनी मनिषा महादेव रेडकर यांच्या नांवाने ६ गुंठे क्षेत्र विकत घेण्यास परवानगी दिलेली आहे व त्याप्रमाणे खरेदीखत झालेले आहे व तशी नोंद सातबारा उता—याला झालेली आहे.

१६. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९९ मध्ये राधाबाई सोनुर्लेकर यांनी दावा मिळकत ही त्रयस्थ असामींना विक्री करण्यासाठी वृत्तपत्रातून जाहीर नोटीस दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही त्या नोटीसला हरकत घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्याचवेळी राधाबाई सोनुर्लेकर यांनी आम्हाला त्या मिळकतीशी तुमचा संबंध नाही असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी राधाबाई सोनुर्लेकर यांच्याविरूध्द दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०३/०३/२००१ रोजी राधाबाई सोनुर्लेकर हिने दावा मिळकतीची मोजणी करून घेतली. त्याबाबत मी कोठेही हरकत घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही वनश्री फार्म माडखोल यांच्याकडून झाडे घेवून त्यांची लागवड दावा मिळकतीत केली हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचा ताबा व कब्जा आजही प्रतिवादींकडे आहे. हे म्हणणे खरे आहे की, राधाबाई सोनुर्लेकर हिने मला दावा मिळकतीचा ताबा दिला असा कागद करून दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०६/०४/१९९१ रोजीचा करार हा प्रतिवादींनी लिहून दिलेला नसल्यामुळे त्यांच्यावर बंधनकारक नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीतील झाडांचे उत्पन्न प्रतिवादी घेतात. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यात नमुद कारण खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे दाव्यातील व सरतपासाचे शपथपत्रातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/—

(एम्. एस्. बुधवंत)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी.

दिनांक :—३१/०१/२०१९.